अपर कामगार आयुक्त (गट-अ) एस-२५ (रू.७८,८००-२,०९,२००) या पदावर तात्पुरती पदोन्नती देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**
**शासन आदेश क्रमांकः पदोन्न-२०२३/प्र.क्र.३१४/कामगार-८**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २५ जून, २०२४

वाचा :

१) सामान्य प्रशासन विभाग ,शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्या.-१२, दि.०१.०८.२०१९.
२) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. ईएसबी-११२४/ प्र.क्र.४/ आस्थामं (का.१३), दिनांक १८.०१.२०२४.

**शासन आदेश:**

कामगार आयुक्त यांच्या आस्थापनेवरील कामगार उप आयुक्त, गट-अ या संवर्गातील खालील नमूद अधिकारी यांना अपर कामगार आयुक्त, गट-अ या संवर्गात या शासन आदेशान्वये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. त्यांना पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नाव, पदनाम | प्रवर्ग | पदोन्नतीनंतरची पदस्थापना / कार्यालय |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | ४ | श्री. संतोष संपत भोसले, कामगार उप आयुक्त | खुला | अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग, मुंबई |

२. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून सदर संवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार आणि सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर तात्पुरत्या पदोन्नतीस मान्यता देण्यात येत आहे.

३. उपरोक्त तक्त्यात नमूद पदोन्नत अधिकाऱ्यास पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी याद्वारे तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत असून त्यांनी नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे. याबाबतचा रुजू अहवाल संबंधित पदोन्नत अधिकारी यांनी कामगार आयुक्त यांच्यामार्फत शासनास सादर करावा. पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयानुसार संबंधितावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच त्यांनी अनधिकृतपणे रजेवर जाऊ

नये. तसेच पदस्थापना रद्द अथवा त्यात बदल करणेसाठी कोणत्याही स्वरुपाचे आवेदन सादर करु नये. तसे केल्यास सदर अधिकारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील २ (ड) मधील तरतुदीनुसार पदोन्नतीने नियुक्ती होणारे अधिकारी यांनी सदर आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या विहित मुदतीमध्ये रुजु होणे आवश्यक आहे. सदर मुदतीत रुजु न झाल्यास संबंधित अधिकाऱ्याचा अनुपस्थितीचा कालावधी अकार्यदिन (dias non) म्हणून गणला जाईल, याची देखील संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०६२५१३४०४८७२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SAGUNA GANESH THENGIL

Digitally signed by SAGUNA GANESH THENGIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRY ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT,
2.5.4.20=d46fe3bd37ed57f0bdb52fb3a029adc135025943cb93cc90de6ceb564ced5ea3,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=8B4022592C04665617981351F8579C9ABD8539AE93768B3FF96B29E67B146A80, cn=SAGUNA GANESH THENGIL
Date: 2024.06.25 13:52:50 +05'30'

**( सगुणा काळे-ठेंगील )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. कामगार आयुक्त, कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
४. अपर कामगार आयुक्त, कोकण.
५. महालेखापाल कार्यालय (ले. व अ.)/(ले.प.), मुंबई-१.
६. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
७. संबंधित पदोन्नत अधिकारी (कामगार आयुक्त यांचेमार्फत)
८. निवड नस्ती (कामगार-८).